जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४८७ दिनांक - ०४/०४/२०२३**

## वानवडी पोलीस स्टेशन,पुणे शहर

## विराज जगदिश यादव (टोळी प्रमुख) व त्याचे इतर ०६ साथीदार यांचेविरूध्द मकोका अंतर्गत कारवाई

दिनांक ०५/०६/२०२३ रोजी ससाणे वस्ती,मोहमंदवाडी रोड,हडपसर पुणे येथे सार्वजनिक रोडवर फिर्यादी व त्यांचे मित्र असे मोटार सायकलवरुन चहा पिण्यासाठी गुलामअली नगर येथे जात असताना,त्यांचेशी जुना वाद असलेला इसम यश सुनिल ससाणे,रा.गल्ली नंबर १५, सैय्यदनगर,पुणे हा गाडीवर त्याचे मित्रासह येवुन,फिर्यादी यांचे बाजुने कट मारुन,पुढे काही अंतर जावुन,आज तेरा मै गेम बजाता हूँ असे म्हणून त्याने त्याचा शर्ट वर करून,त्याचे कमरेला लावलेले पिस्टल काढून,फिर्यादी यांना जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने,सदर पिस्टल मधुन फिर्यादी यांचे अंगावर दोन राउंड फायर करुन दहशत करीत निघून गेले. त्याबाबत फिर्यादी यांनी नमुद इसमां विरुध्द वानवडी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने **वानवडी पोलिस स्टेशन गुन्हा रजि.नं.२५८/२०२३,भा.दं.वि.कलम ३०७,१२०(ब),२१२,१०८,१०९,२०१, ३४,क्रिमी.ॲमेन्डमेंट ॲक्ट कलम ७, भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५),महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१) (३)सह १३५** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्ह्याचे तपासा दरम्यान नामे **१)विराज जगदिश यादव,वय-२५ वर्षे,रा.आदित्य रेसिडेन्सी फ्लॅट नं.१०४,हांडेवाडी रोड,आनंदनगर,हडपसर,पुणे (टोळी प्रमुख) (पाहीजे आरोपी) २)यश सुनिल ससाणे,वय-२२ वर्ष,रा.सैय्यदनगर गल्ली नं.१५/ए,महंमदवाडी रोड,हडपसर पुणे ३) चेतन बाळू जाधव,वय-२१ वर्ष रा.अमित हाईटस सोसायटी, अपेक्षा पॅलेस बिल्डिंग, ससाणेनगर, हडपसर,पुणे ४)गुफ्या ऊर्फ गुफरान ऊर्फ मतीन फिरियाज खान,वय-२१ वर्षे,रा.गल्ली नं.१५/ए, सय्यदनगर,महंमदवाडी रोड, हडपसर,पुणे ५) गुलाम गौस मुस्तफा खान,वय-२१ वर्षे, रा. गल्ली नं.२३/ए,सय्यदनगर,महंमदवाडी रोड, हडपसर,पुणे ६)अक्षय नागनाथ कांबळे वय-२३ वर्षे रा.ससाणेनगर लेन नं,१५,हडपसर,पुणे, ७)अथर्व नंदु शेंडगे,वय-२० रा.स.न.१५,विठ्ठलनगर मांजरी फाटा,हडपसर,पुणे तसेच चाळ नं.९५,पर्वती, पुणे (टोळी सदस्य) यापैकी (अ.क्र.२ व ४ यांना अटक करण्यात आली आहे.) अ.क्र.१,३,५,६ व ७ हे पाहिजे आरोपी आहेत.**

आरोपी नामे **१)विराज जगदिश यादव,वय-२५ वर्षे,रा.आदित्य रेसिडेन्सी,हांडेवाडी रोड आनंदनगर,हडपसर,पुणे** व त्याने त्याचे साथीदारासह स्वतःचे टोळीचे परिसरात वर्चस्व निर्माण व्हावे व त्यातुन गैरवाजवी व आर्थिक व इतर फायदा मिळविणेकरीता गुन्हे केलेले असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

नमुद गुन्हयांस महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) चा अंतर्भाव करणेबाबत वानवडी पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक,श्री. भाउसाहेब पठारे, यांनी मा.पोलिस उप-आयुक्त,परि.५,श्री.विक्रांत देशमुख यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री,रंजनकुमार शर्मा यांना सादर केला होता.

सदर प्रकरणी छाननी करुन वानवडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं.२५८/२०२३,भा.दं.वि.कलम ३०७,१२०(ब),२१२,१०८,१०९,२०१,३४, क्रिमीनल ॲमेन्डमेंट ॲक्ट कलम ७, भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५),महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१)(३)१३५ या गुन्हयास महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) प्रमाणे मंजूरी देणेत आलेली आहे.

पुढील तपास सहा.पोलीस आयुक्त,वानवडी विभाग,पुणे शहर,श्री.शाहुराजे साळवे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर,श्री.संदीप कर्णीक, मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.रंजन कुमार शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त,परीमंडळ-५ पुणे शहर, श्री.विक्रांत देशमुख, मा.सहा.पोलीस आयुक्त, वानवडी विभाग पुणे शहर,श्री.शाहुराजे साळवे यांचे मार्गर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,वानवडी पोलीस स्टेशन,पुणे शहर,श्री.भाउसाहेब पठारे, पोलीस निरीक्षक,गुन्हे,श्री.संदीप शिवले, पोलीस उप-निरीक्षक,अजय भोसले पोलीस उप निरीक्षक,संतोष सोनवणे, श्रेणी पोलीस उप-निरीक्षक,ज्ञानदेव शेलार पोलीस अंमलदार,मनोज साळुंखे, अमोल घावटे, उत्तरेश्वर धस यांनी कारवाई केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी कार्यभार घेतल्यानंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देऊन शरिराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून,गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्या बाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मोक्का अंतर्गत केलेली ही ३२ वी कारवाई आहे.**